**BEFORE NATIONAL- LOK- ADALAT HELD AT BARSHI,**

**Dated 14th March 2026**

(Organized by the Member Secretary, District Legal Services Authority, Solapur under Section 19, Legal Services Authority Act1987)

RCS Case No 169 of 2026

Exhibit No.

Name of the Court Which Referred the Case –

Rohit Rajendra Jadhav Applicant /Plaintiff

V/s

Hanumant Ankush Kolekid Respondent /Defendant

Present :-

Name of Judicial Officer – **Smt. P.V. Raut, Jt. C.J.J.D, & J.M.F.C., Barshi.**

**( Panel Head, National Lok Adalat)**

Name of the members --. Adv. Shri. Kapil K. Bhosale

**AWARD**

The dispute between the parties having been referred for determination to the Lok-Adalat and the parties having compromised matter. The following award is passed in terms of the settlement.

**As per pursis filed ~~below~~ Exh.** annexed here with

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded.

Jadhav.R.R

Applicant/s

हा.नि. शैलाल हनुमंत अंकुश कोळेकर यांचा सही.

Respondent's

Adv. for applicants

Adv. for respondent's,

Acquiring Body

Adv. for Acquiring Body

14-03-2026

(Smt. P.V. Raut)
Panel Head,
National Lok Adalat.
Date: 14/03/2026

बार्शी.

(Adv. Shri. Kapil K. Bhosale )
Member,
National Lok Adalat
Place:- Barshi

**तडजोड पुरसीस**

रे. मु. नं. ९८९/२०२६

# बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो यांचे कोर्टात

**श्री रोहित राजेंद्र जाधव --- वादी**

**विरूध्द**

**श्री. हनुमंत अंकुश काशिद --- प्रतिवादी**

**यात वादी व प्रतिवादी तर्फे तडजोड पुरसीस अशी की,**

१) सदरचा दावा वादीने प्रतिवादीचे विरुध्द डिक्लेरेशन निरंतर मनाई मिळणेसाठी केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे मधील हितसंबंध चांगले रहावेत म्हणून त्यांनी आपसात खालील प्रमाणे तडजोड केलेली आहे त्यांचा तपशील,

२) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे दहिटणे येथील जमीन ही लिहुन घेणार यांचे कब्जात व मालकी हक्कात असलेली जागा याचा गट नं. १४५ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ८३ आर, आकार ०२ रु. ७२ पैसे असून यापैकी उत्तर बाजुची यातील लिहून देणार यांचे नावे ०० हे. ३६.७० आर याचा आकार ०१ रु. २० पैसे यामधील लिहून घेणार यांना दक्षिण बाजूकडील क्षेत्र ४५ x ३० चौ. फुट याची मोजमापे पूर्वपश्चिम ४५ फुट दक्षिणउत्तर ३० फुट याचे एकुण क्षेत्रफळ १३५० चौ. फुट असे यासी चतु:सिमा पूर्वेस - विमल जाधव यांचे क्षेत्र, दक्षिणेस - नानासाहेब काशीद यांचे गट नं. १४५ मधील उर्वरीत क्षेत्र पश्चिमेस- प्रशांत सुर्यकांत काशीद यांचे क्षेत्र, उत्तरेस- १० फुट रुंदीचा रस्ता याचे पाणी व वागणुक उत्तर बाजुने जाते व आहे.

३) वर नमूद दावा कलम २ मधील मिळकती या वादी यांनी प्रतिवादी यांचेकडुन सन २०२० मध्ये रू. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख रू.) हे स्विकारुन त्यांच्या कौटुंबिक गरजेपोटी घेतलेले होते व तेंव्हा सदर

जागेचा कब्जा यातील वादी यांना दिलेला होता. प्रतिवादींनी देखील वादीची कब्जे वहिवाट असलेबाबतचे करारपत्र देखील दि. ०२/०३/२०२६ रोजी प्रतिवादींनी वादीस बनवुन दिलेले होते. हे यातील प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे. त्यावेळीपासून ते आजतागायत यातील वादी यांचे मालकी हक्काने वर नमूद मिळकतीवर प्रत्यक्ष कब्जेवहिवाट असलेचे प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

४) यातील प्रतिवादी हे वाद मिळकतीस यापुढे कोणताही हरकत अडथळा करणार नाहीत. तसेच यातील वादी हेच दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटदार आहेत हे प्रतिवादीस मान्य व कबूल आहे

५) सदर दाव्यांचा खर्च यातील वादी व प्रतिवादी यांना आपला आपण सोसणेचा आहे.

येणेप्रमाणे तडजोड हुकूमनामा व्हावा. हि तडजोड पुरसीस दिली.

ता. १४/०३/२०२६



**वादी तर्फे ॲडव्होकेट** **वादी**



**प्रतिवादी तर्फे ॲडव्होकेट** **प्रतिवादी**